निवडक



## पालये केरी रस्ता धोकादायक; मार्ग बदलण्याची वाहन चालकांची मागणी

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. १८ :** मांद्रे मतदारसंघातील पालये, केरी रस्त्याचे दळण वळण अंत्यत धोकादायक असून अनेकदा छोटे मोठे अपघात होत असल्याने त्याची रचना बदलण्याची मागणी वाहन चालकांनी केली आहे.

हा पाच किलोमीटरचा रस्ता मुळात इतका कठीण व वळणावळणाचा असल्याने वाहने हाकणे बरेच अवघड होत असते. बरेच उंच सखल त्यात पुढून येणारे वाहन अती वेगाने आल्यास व नजर किंचित हटल्यास, क्षणाचा विलंब झाल्यास कपाळमोक्ष होण्याची खात्रीच असते, असे मत वाहनचालक बाळा पेडणेकर यांनी सांगितले. गेल्या महिन्यात कोल्हापूर मधील चार चाकी वाहनाचा असाच अपघात झाल्याने नाहक तीस हजाराचा फटका बसला. या स्थितीत रस्त्याची रचना बदलण्याची मागणी पेडणेकर यांनी केली आहे.

या रस्ता मार्गातून आरोंदा पुल ओलांडल्यानंतर सावंतवाडी,मालवण, चिपी विमानतळ प्रकल्प तसेच सावंत वाडी रेल्वे स्थानकनजीक प्रवासी व मालवाहतूक वर्दळ वाढली आहे.पहाटे मोठ्या प्रमाणात रेती, चिरे वाहतूक वर्दळ असल्याने मोठा अपघात घडण्यापूर्वी रस्ता समांतर करण्याची मागणी होत आहे.

दरम्यान, पावसाळ्यानंतर या रस्त्याचे डांबरीकरण, रुंदीकरण काम सुरू होणार असल्याचे आमदार जीत आरोलकर यांनी सांगितले होते. मात्र या रुंदीकरण वेळी किमान चार पाच ठिकाणी असणारे छोटे चढण व उतार पाहता,अत्यंत धोकादायक व जीवघेणे असल्याने त्याची रचना समांतर करण्याची मागणी नागरिक संदेश नाईक, आरोंदा यांनी केली आहे.

तरी मांद्रे मतदारसंघाचे आमदार जीत आरोलकर यांनी याबाबतीत रस्त्याची धोकादायक स्थिती लक्षात घेऊन या रस्त्याची रचना बदलण्यासाठी पावले उचलावीत अशी मागणी होत आहे.

# सावर्डे ग्रामसभेत बंधारा वाद पेटला

### ग्रामस्थांचा प्रकल्पाला विरोध | पंच सदस्यांच्या राजीनाम्याची मागणी

■ टीम दैनिक हेराल्ड

**सावर्डे, दि. १८ :** झुआरी नदीवर जलसंपदा विभागाने फळणे येथे प्रस्तावित केलेल्या वादग्रस्त बंधारा प्रकल्पाविरोधात रविवारी झालेल्या सावर्डे ग्रामसभेत ग्रामस्थांचा तीव्र रोष उसळला. मोठ्या संख्येने उपस्थित राहिलेल्या ग्रामस्थांनी ग्रामपंचायतीच्या भूमिकेवर नाराजी व्यक्त करत सर्व नऊ पंच सदस्यांच्या राजीनाम्याची एकमुखी मागणी केली.

ग्रामस्थांनी यापूर्वी याच प्रकल्पाला विरोध दर्शवून नापसंती नोंदवली असतानाही, तो परस्परपणे पुन्हा सुरू कसा झाला, याविषयी तीव्र संताप व्यक्त केला. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, कोणतीही पूर्वसूचना न देता आणि ग्रामसभा न घेता पुन्हा एकदा हा प्रकल्प पुढे रेटण्यात आला. या संदर्भात ग्रामपंचायतीने कोणतीही माहिती न दिल्यामुळे नागरिकांमध्ये मोठा संताप उसळला. या निर्णयामागील पारदर्शकतेचा अभाव, तसेच ग्रामस्थांना विश्वासात न घेता बंधाऱ्याला मंजुरी देण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर ग्रामसभेत गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.



ग्रामस्थांनी उपस्थित पंच सदस्यांना थेट प्रश्न विचारत स्पष्ट उत्तरे मागितली. गावाच्या हिताच्या विरोधात निर्णय घेतले जात आहेत, असा आरोप करत गावकऱ्यांनी बंधारा प्रकल्प रद्द करण्याची ठाम मागणी मांडली.

यासोबतच, गावाच्या हद्दीत अशा कोणत्याही प्रकारच्या प्रकल्पांना पूर्णतः बंदी घालावी,असा ठाम ठराव ग्रामसभेत मांडण्यात आला.

सभेमध्ये आम्हाला बंधारा नको आहे', असा संतप्त नारा अनेक वेळा दुमदुमला. ग्रामसभेत वातावरण इतके तापले की, जनतेने सर्व नऊ पंच सदस्यांचा राजीनामा मागितला. गावाच्या भावी पिढ्यांच्या हक्कांवर गदा आणणाऱ्या निर्णयांना आम्ही मूकपणे स्वीकारणार नाही, असा स्पष्ट इशारा ग्रामस्थांनी दिला.ग्रामस्थांनी प्रशासनाच्या आणि पंचायतीच्या भूमिकेवर नाराजी व्यक्त करत हा प्रकल्प तात्काळ थांबवण्याची मागणी केली. गावाच्या भविष्यात धोका निर्माण करणाऱ्या कोणत्याही प्रकल्पाला अनुमती दिली जाणार नाही, असा स्पष्ट संदेश या ग्रामसभेतून देण्यात आला.

## न्यू मार्केट आणि गांधी मार्केटच्या नूतनीकरणाला सुरुवात

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. १८ :** अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर आणि विक्रेते तसेच नागरिकांच्या सातत्यपूर्ण मागणीनंतर मडगाव शहरातील प्रतिष्ठित न्यू मार्केट व गांधी मार्केट या दोन मुख्य बाजारपेठांच्या नूतनीकरणाच्या कामांना अखेर सुरुवात झाली आहे.

मडगाव नगर परिषद (एमएमसी) यांच्या वतीने हे काम हाती घेण्यात आले असून, संरचनात्मक सुधारणा तसेच वाढीव अग्निसुरक्षा उपाययोजनांवर भर देण्यात आला आहे. या दोन्ही बाजारपेठा जुन्या असून त्यांची अवस्था काळानुरूप जीर्ण झाली होती. त्यामुळे विक्रेत्यांच्या तसेच ग्राहकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला होता.

नूतनीकरणासाठी स्थानिक आमदारांनी आपल्या आमदार निधीतून एकूण १.४० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. त्यापैकी १ कोटी रुपये न्यू मार्केटसाठी, तर ४० लाख रुपये गांधी मार्केटसाठी खर्च करण्यात येणार आहेत. यामध्ये गळकी छपरे बदलणे, पेव्हर ब्लॉक दुरुस्ती, तसेच अनेक कालबाह्य व अडथळा निर्माण करणाऱ्या बाबी दूर करण्याचा समावेश आहे.

या कामांबरोबरच अग्निसुरक्षेचे उपाय ही केंद्रस्थानी असलेली बाब ठरली आहे. मागील काही वर्षांत या दोन्ही बाजारपेठांमध्ये आगीच्या घटनांचे प्रमाण वाढल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या (पाणीपुरवठा) मार्फत ७० लाख रुपयांची निविदा काढण्यात आली असून, पाण्याचा दाब वाढवण्यासह बाजारपेठांभोवती अग्निशामक हायड्रंट बसवण्याचे नियोजन आहे. या उपाययोजनांमुळे आपत्कालीन प्रसंगी प्रतिसादाचा वेग वाढण्यास मदत होईल, असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

न्यू मार्केटमधील विक्रेते गोपाळ नाईक यांनी हेराल्ड मिडियाशी बोलताना समाधान व्यक्त करताना सांगितले की, नूतनीकरणाचे काम सुरू झाल्याचे आम्हाला मनःपूर्वक स्वागत करावेसे वाटते. गेल्या बैठकीत आम्ही गळणारी छपरे आणि आगीच्या धोक्याबाबत चिंता व्यक्त केली होती. अधिकाऱ्यांनी आम्हाला पावसाळ्यापूर्वी काम पूर्ण करण्याचे आश्वासन दिले आहे.

नाईक पुढे म्हणाले की, बाजारात बेकायदेशीर अतिक्रमण आणि अव्यवस्थित पार्किंगमुळे मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होते. या समस्या सोडवण्यासाठी आम्ही पोलिस प्रशासनाकडे नियमित तपासणीसाठी विनंती केली आहे.

मडगावनगर परिषदेने दोन्ही बाजारपेठांच्या नूतनीकरणासाठी स्वतंत्र निविदा प्रक्रिया राबवण्याचे स्पष्ट केले आहे. या उपक्रमामुळे बाजारपेठांचे पूर्वीचे वैभव पुन्हा प्राप्त होण्याबरोबरच विक्रेते आणि ग्राहकांसाठी सुरक्षित व सुसज्ज वातावरण निर्माण होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

# असोल्डा ग्रामसभेत सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पास विरोध

■ टीम दैनिक हेराल्ड

**असोल्डा, दि. १८ :** असोल्डा गावात रविवारी पार पडलेल्या ग्रामसभेत झुआरी नदीच्या उपनदीच्या काठावर होदर येथे प्रस्तावित सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पास (एसटीपी) ग्रामस्थांनी तीव्र विरोध नोंदवला. पर्यावरणीय प्रभाव मूल्यांकन (ईआयए) न करता या प्रकल्पाला ग्रामपंचायतीकडून ना हरकत प्रमाणपत्र (एनओसी) देण्यात आल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली.

ग्रामस्थांनी या प्रकल्पामुळे परिसरातील पर्यावरणीय समतोल बिघडण्याचा इशारा दिला. जलस्त्रोताच्या अगदी निकट प्रस्तावीट असलेल्या या प्रकल्पामुळे जैवविविधतेवर आणि स्थानिक लोकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. त्यांनी तातडीने एनओसी रद्द करून सखोल पर्यावरणीय अभ्यास हाती घेण्याची मागणी केली.



ग्रामसभेत असोल्डा गावात वाढत चाललेल्या बेकायदेशीर बांधकामांचा मुद्दाही ऐरणीवर आला. कोमुनिदाद जमिनीवर अतिक्रमण होत असून त्यावर अद्याप ठोस कारवाई न झाल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली. मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठाने २०२४ मध्ये जनहित याचिका (सेंट) क्र. ३ अंतर्गत दिलेल्या स्पष्ट निर्देशानुसार, अशा बांधकामांवर कारवाई करणे बंधनकारक असतानाही पंचायत प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला.

विशेषतः सातेरी देवस्थानच्या मालमत्तेवर उभारलेल्या अनधिकृत बांधकामाला पंचायत प्रशासनाने तीन–फेज वीजजोडणीसाठी एनओसी दिल्याचा गंभीर आरोपही ग्रामसभेत करण्यात आला. या कृतीमुळे धार्मिक भावना दुखावल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. ग्रामसभेत बोलताना स्थानिक युवा नेते आदित्य देसाई यांनी पंचायतीच्या निष्क्रियतेवर सडकून टीका केली. राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण आणि मुंबई उच्च न्यायालयाने स्पष्ट आदेश दिले असूनही पंचायत त्याकडे दुर्लक्ष करत आहे. ही गंभीर गोष्ट असून न्यायालयाच्या आदेशाचा अवमान मानला जाऊ शकतो. पाच वर्षांहून अधिक काळ काही तक्रारी प्रलंबित असून त्यावर कोणतीही कारवाई झालेली नाही, हे अत्यंत दुर्दैवी आहे, असे देसाई म्हणाले.

या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांनी हा विषय पंचायत विभाग तसेच गोवा राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे घेऊन जाण्याचा इशारा दिला. पर्यावरणीय कायद्यांची कडक अंमलबजावणी, प्रशासनाची पारदर्शकता आणि जबाबदारी निश्चित करावी, अशी जोरदार मागणी ग्रामसभेत करण्यात आली.

# १६ लाखांचे अमली पदार्थ जप्त : ५ अटकेत

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १८ :** अंमली पदार्थांच्या तस्करीच्या विरोधात उत्तर जिल्हा पोलिस व गुन्हे शाखा (सीबी) यांनी संयुक्तपणे तीन वेगवेगळ्या कारवाया करून कर्नाटक व हिमाचल प्रदेशातील पाच संशयितांना अटक केली आहे. या कारवायांमध्ये तब्बल १६ लाख रुपये किमतीचे अमली पदार्थ जप्त करण्यात आले आहेत.

शनिवारच्या पहाटे गुन्हेशाखेच्या पथकाने गोवा राज्य मध्यवर्ती ग्रंथालयाजवळ विशिष्ट गुप्त माहितीच्या आधारे कर्नाटकातील उडुपी येथील साजीर (वय ३३), मोईदिन अश्मिन (२२) व मोहम्मद सुहेल (२१) या तिघांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून ९१.९३४ ग्रॅम एमडीएमए, एक कार आणि सात मोबाईल फोन जप्त करण्यात आले. या वस्तूंचा अंदाजित बाजारभाव सुमारे १२ लाख रुपये आहे, असे पोलिस अधीक्षक (सीबी) राहुल गुप्ता यांनी स्पष्ट केले.

शुक्रवारी रात्री उशिरा असागाव चर्चजवळ हणजूण पोलिसांनी कर्नाटकाच्या संतोष लमाणी (२४) याला शाळेच्या बॅगेत लपवलेले ९.४९ ग्रॅम एमडीएमए आणि ४.४६ ग्रॅम कोकेनसह अटक केली. या वस्तूंची किंमत अंदाजे २.१० लाख रुपये आहे. त्याच दिवशी संध्याकाळी, हणजूण पोलिसांच्या दुसऱ्या पथकाने पेडे येथील फुटबॉल मैदानाजवळ हिमाचल प्रदेशातील अनिल कुमार (२६) याला १८२ ग्रॅम चरस व ४३ हजार रुपये रोख रक्कमेसह ताब्यात घेतले. या चरसची किंमत सुमारे १.८२ लाख रुपये आहे.

पोलिसांनी या तिन्ही प्रकरणांमध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोर पालन केले असून, राज्यात ड्रग्जच्या तस्करीवर अंकुश घालण्यासाठी विभाग कटिबद्ध आहे, असे एसपी राहुल गुप्ता यांनी सांगितले.

# शाश्वत शेतीसाठी योगदान देणाऱ्यांचा झाला गौरव

■ टीम दैनिक हेराल्ड

**वास्को, दि. १८ :** चिखली युथ फार्मर्स क्लब (सीवायएफसी) यांच्या वतीने शाश्वत शेती पुनरुज्जीवनासाठी योगदान देणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा नुकताच एका विशेष समारंभात सन्मान करण्यात आला. तरुण पिढीला शेतीकडे वळवण्यासाठी आणि ग्रामीण संस्कृतीशी जोडून ठेवण्यासाठी हा उपक्रम एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरला.

कार्यक्रमाची सुरुवात चिखलीच्या शेती परंपरेचे आधारस्तंभ मानल्या जाणाऱ्या अनुभवी शेतकऱ्यांच्या सत्काराने झाली. शेतीच्या ज्ञानसंपन्न परंपरेला पुढे नेण्यासाठी आणि नव्या पिढीला प्रेरणा देण्यासाठी रुई मॅन्यूएल दा कोस्टा अरौजो, मॅन्युएल फर्नांडिस, इनासियो केटानो फर्नांडिस, केटानो बारबोजा, प्रभाकर बी. गावडे आणि जयश्री गावडे यांचा गौरव करण्यात आला.

तरुण शेतकऱ्यांना शेतीसाठी आपली जमीन मुक्तपणे वापरू दिल्याबद्दल क्लबने काही जमीन मालकांचे मनःपूर्वक आभार मानले. कोनी डि'कोस्टा, अँटोनिएटा नूनेस, शशिकांत उसगावकर, विली दा कोस्टा, जेरोम मार्टिन आणि विकी केरकर यांचा सन्मान करण्यात आला.

शेतीच्या रोजच्या कामात मोलाची भूमिका बजावणाऱ्या शेतमजुरांनाही यावेळी विशेष गौरवण्यात आले. कॅन्युट पीटर डि'सूझा, फ्रान्सिस टेलेस, सोमेश वाडियार आणि इस्माईल सब इटागी यांचा सत्कार करत त्यांचे योगदान अधोरेखित करण्यात आले.

सामुदायिक शेती उपक्रमात सहभागी होऊन विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव देणाऱ्या सेंट अँड्र्यूज आयसीएसई स्कूल (वास्को) आणि रेजिना मुंडी स्कूल (चिखली ) या शाळांचा विशेष उल्लेख करण्यात आला. शाळेच्या शिक्षक व विद्यार्थ्यांनी शेतात काम करून पर्यावरणीय शिक्षण व समाजसेवेची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये रुजवली.

क्लबच्या शेती व समाजसेवा उपक्रमात सक्रीय सहभाग घेतल्याबद्दल नऊ तरुण सदस्यांनाही सन्मानित करण्यात आले. शोगुन फर्नांडिस, व्हॅलेरी अफोंसो, चेल्सी वीणा फर्नांडिस, जेरिको वाझ, झेवियर मोहन, जोनास दा कोस्टा, पांडुरंग भगत, वलिशा गामा आणि अलिशा परेरा या तरुणांनी शेती कार्यात सक्रिय योगदान दिले.

कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी क्लबने आपल्या मार्गदर्शकांना, फादर (डॉ.) बोलमॅक्स परेरा, फादर पीटर फर्नांडिस आणि रुई मॅन्युएल दा कोस्टा अरौजो कृतज्ञतापूर्वक अभिवादन केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे युवा सदस्यांना शेतीकडे नव्या दृष्टीकोनातून पाहण्याची प्रेरणा मिळाली. हा कार्यक्रम शेती ही केवळ उदरनिर्वाहाची साधनाच नसून, ती एक संस्कृती, वारसा आणि सामाजिक बांधिलकी असल्याचे अधोरेखित करणारा ठरला. स्वयंपूर्ण आणि टिकाऊ कृषी व्यवस्थेकडे वाटचाल करण्याच्या नव्या संकल्पासह कार्यक्रमाची सांगता झाली.

## भूमिपुरुष देवाचा २२ रोजी वर्धापनदिन

■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. १८ :** आस्कण – शिरोडा येथील भूमिपुरुष देवस्थानचा वर्धापनदिन सोहळा गुरुवार दि. २२ रोजी साजरा करण्यात येणार आहे.

दरवर्षी तिथीनुसार श्री भूमिकापुरुष देवस्थानचा वर्धापनदिन आस्कण आणि शेणवीवाड्यावरील कुळाव्यांकडून साजरा केला जातो. सकाळी धार्मिक विधी, नंतर महाप्रसाद होणार आहे. म्हादू व्यंकटेश प्रभुगावकर यांचा देवस्थानच्या कुळाव्याकडू दुपारी १२ वाजता सत्कार होईल. संध्याकाळी ७ वाजता भजन, आरती व तीर्थप्रसाद होईल.

# कपिलेश्वरी नाल्याची दुर्दशा कायम

### नाला प्रचंड प्रदूषणाच्या गर्तेत सापडला : कचऱ्याचा बनला ढिगारा

■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. १८ :** एकेकाळी शेती, आंघोळ व धुलाईसाठी जीवनवाहिनी मानला जाणारा कपिलेश्वरी नाला आज प्रचंड प्रदूषणाच्या गर्तेत सापडला आहे. फोंड्याचा प्रमुख जलमार्ग म्हणून ओळख असलेल्या या नाल्यात आता औद्योगिक सांडपाणी, हॉटेलमधील उष्टा कचरा, प्लास्टिक, थर्माकोल आणि इतर घनकचऱ्याचे बिनधास्त डंपिंग सुरू असून, हा नाला अक्षरशः कचऱ्याचा ढिगारा बनला आहे.

जलसंपदा विभाग दरवर्षी लाखो रुपयांचा खर्च करून नाल्याची सफाई व गाळ काढण्याचे काम करतो. मात्र, स्थानिक लोकांकडून आणि व्यवसायिकांकडून कचरा टाकण्याचे प्रमाण काही केल्या थांबत नाही. हा नाला बेतोडा , कुर्टी , फोंडा नगरपालिका क्षेत्र, कवळे आणि बांदोडा या भागांतून वाहत झुआरी नदीत विलीन होतो. मात्र त्याआधी, बंधाऱ्याजवळ तो मोठ्या प्रमाणात प्लास्टिक आणि सांडपाण्याने भरलेला दिसतो. यामुळे पावसाळ्यात पूर येण्याचा धोका वाढला आहे.



वरच्या प्रवाहात काही ठिकाणी प्रक्रिया न केलेले औद्योगिक सांडपाणी सोडले जात असल्याचे निदर्शनास आले आहे. परिणामी, नाल्याच्या पाण्यात मृत मासे तरंगताना दिसतात. स्थानिक पंचायतींनी व प्रदूषण नियंत्रण मंडळाने वेळोवेळी तपासणी करूनही ही स्थिती सुधारलेली नाही. मुख्य नाल्यात सामील होणाऱ्या उपनद्यांतूनही मोठ्या प्रमाणावर कचरा वाहून येतो.

फोंडा पालिकेने नाल्यात सांडपाणी सोडणाऱ्या नागरिकांना अनेकवेळा नोटिसा बजावल्या असून, सांडपाणी व्यवस्थेशी जोडणी करण्याचे आवाहनही केले आहे. मात्र दुर्दैवाने, अनेकजण अजूनही दुचाकी आणि चारचाकी वाहनांतून थेट नाल्यात कचरा टाकतात. यावर नियंत्रणासाठी कोणतीही प्रभावी यंत्रणा अस्तित्वात नाही.

या नाल्याचे पाणी सिंचनासाठी वापरणाऱ्या कवळे आणि बांदोडा येथील शेतकऱ्यांवर याचे गंभीर परिणाम होत आहेत. सांडपाण्यामुळे शेतजमिनीत पुरळ, दुर्गंधी आणि आरोग्यविषयक त्रास उद्भवत आहेत. परिणामी, काही शेतकऱ्यांना शेती सोडावी लागल्याचे सांगण्यात येते. सध्या स्थितीला रोखण्यासाठी, जलसंपदा विभागाने अलीकडेच सर्व सहा कल्व्हर्टवर स्टीलच्या जाळ्या बसवल्या आहेत, जेणेकरून वाहनांमधून कचरा टाकण्यास प्रतिबंध होईल.

फोंड्याचे आमदार व राज्याचे कृषी मंत्री रवी नाईक यांनी नाल्यातील कचराकुंडीविषयी नाराजी व्यक्त करत सांगितले की, पंचायत आणि पीएमसीच्या कार्यक्षेत्रातील लोकांनी जबाबदारीने वागले पाहिजे. दरवर्षी गाळ काढला जातो, पण लोकांचा मानसिकतेत बदल होत नाही. पालिकेकडून दररोज कचरा संकलन केले जाते, तरीही काही जण नाल्यातच कचरा टाकतात, हे अत्यंत खेदजनक आहे.त्यांनी नागरिकांना सांडपाणी व्यवस्थेशी जोडणी करून जलवाहिन्या स्वच्छ ठेवण्याचे आवाहन केले.

फोंडा पालिकेचे अध्यक्ष आनंद नाईक यांनी देखील नागरिकांनी शहर स्वच्छ ठेवण्याच्या मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन केले. प्रत्येक नागरिकाने स्वतःहून जबाबदारी स्वीकारल्यास ही परिस्थिती बदलू शकते,असे ते म्हणाले.

